KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# "संत साहित्यातील नैतिक मूल्ये आणि सामाजिक संदेश: एक चिकित्सक दृष्टिकोन"

**शेळके उमाकांत पांडुरंग**
**संशोधक विद्यार्थी**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.
Email - umakantshelke2014@gmail.com.
भ्रमणध्वनी-8275390170

**प्रा. डॉ. लक्ष्मण नागोराव वाघमारे**
**मराठी विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक**
शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर,
जि. नांदेड.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत जनाबाई , संत मुक्ताबाई, संत सावतामाळी, संत गोरा कुंभार, संत निळोबा, संत चोखामेळा इ. संतांचा समावेश होतो. संतांनी समाजाला श्रेष्ठ आचार - विचारांचे शिक्षण दिले. समाज मनाने सुसंस्कारित झाला पाहिजे तो विध्वंसक मार्गाकडून विधायक मार्गाकडे वळविण्यासाठी मानवी मूल्यांची आवश्यकता आहे हे संताने जाणले. समाजाला चांगली आध्यात्मिक नैतिक मूल्ये दिली. तसेच संतांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून चांगली नीतीमूल्य रुजविली.

संत त्यांच्या मूल्येविचारामार्फत समाजाचे लोकनायक, मार्गदर्शक बनले. तत्कालीन समाजातील काही लोकांचे बोलणे सोसून दुरितांचे तिमिर जावो व त्या जागी ज्ञानदीप लावू म्हणजे समाजाला सन्मार्ग प्राप्त होईल. हा मूल्यविचार संतांनी त्यांच्या वर्तणूकीतून व अभंग रचनेमार्फत समाजाला दिला. संत साहित्य हे दैववादावर भर देणारे आहे, निष्क्रियतेचा पुरस्कार करणारे आहे असे विचार काही अभ्यासक मांडतात. पण प्राप्त परिस्थितीची सामाजिक स्थिती लक्षात घेऊनच संत मंडळींनी भक्तीचा म्हणजे समतेचा मार्ग समाजाला दाखविला.

नैतिक विकास साधण्यासाठी आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व घडविण्यासाठी मानवी मूल्यांची जोपासना अत्यंत आवश्यक आहे. मानवी मूल्यांचा ऱ्हास म्हणजे मानवतेच्या पतनाची सुरुवात होते. हा पराभव थांबवायचा असेल तर संतानी सांगितलेल्या एकूणच मानवाच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग दाखविणाऱ्या मानवी मूल्यांचा मनापासून स्वीकार आणि अंगीकार केल्याशिवाय दुसरा पर्याय आपल्या समोर नाही . हा विचार प्रस्तुत शोधनिबंधातून मांडण्याचा छोटासा प्रयत्न आहे.

**संत साहित्यातील प्रमुख नैतिक मूल्ये:**

**१) सत्य:**

सत्य या नैतिक मूल्यावर अनेक संत कवीने अभंग रचले आहेत, ज्यात संत तुकाराम महाराजांचा विशेषत्वाने उल्लेख आढळतो. संत तुकाराम म्हणतात नेहमी सत्य बोलणाऱ्यास पुण्यप्राप्ती, परमेश्वर प्राप्ती, सुख, शांती लाभते. पुढील अभंगातून सांगितले आहे.

**सत्य बोले निरंतर | तोच पुण्याचा सागर || देव त्याने जिंकायेला | तिन्ही लोकी मानवाला||**
**सर्वाभूती झाला लीन| टाकूनिया अभिमान|| तुका म्हणे जन्मोनिया| शांती सुख लाभे तया||**

**२) अहिंसा:**

संत साहित्य अहिंसेला महत्त्व देते. संतांनी हिंसेचा आणि युद्धाचा विरोध केला आणि सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. तुकाराम महाराज प्राण्यावर हिंसाचार करणाऱ्यांचा तीव्र निषेध करतात आणि म्हणतात –

**मौस खाता घर (हौस ) करी. जोडोनि वैरी ठेवी यला|**

**कोण त्याची करील कीव| जीवे जीव नेणता |**

म्हणजेच तुकाराम महाराज म्हणतात की जो माणूस प्राण्यांची कत्तल करतो आणि त्यांचे मांस खातो तो शत्रुत्व निर्माण करतो. प्राण्यावर क्रुरता करणाऱ्या अशा व्यक्तीला कोण दया दाखवेल ? जो इतर प्राण्यांचा आदर किंवा संरक्षण करत नाही.

**३) समता आणि बंधुभाव:**

माऊलीचे पसायदान हे तर जीवनगीत आहे .हे गीत जगाच्या शांतीसाठी ,मानवतेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे आहे. समता, बंधुता निर्मितीचा पसायदान आधारस्तंभ आहे.

**"जे खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो भूता परस्परे पडो| मैत्र जीवांचे || " .**

**४) सेवा आणि परोपकार:**

सेवा व परोपकार हे संत साहित्याचे महत्त्वाचे मानवी मूल्य आहे .संत सेना महाराजांचा एक अभंग खालील प्रमाणे आहे.

करिता परोपकार| त्याच्या पुण्या नाही पार||१|| करिता परपीडा| त्याच्या पापा नाही जोडा||

जेव्हा तुम्ही परोपकार करता तेव्हा मिळणाऱ्या पुण्याला सीमा नसते. याउलट जेव्हा तुम्ही इतरांना त्रास देता तेव्हा पापालाही जोड नसते म्हणजेच ते अमर्याद असते.

**५) क्षमाशीलता:**

संत साहित्यात क्षमाशीलता एक मानवी मूल्य आहे. संत तुकाराम म्हणतात ज्यांच्याकडे क्षमा शस्त्र आहे तेथे दुष्ट काही करू शकत नाही. ज्वालेची ठिणगी जरी उडाली तेथे गवत नसेल तर तेथे आग लागत नाही. ती ठिणगी विझून जाते. त्याप्रमाणे दृष्टीने प्रयत्न केले तरी 'क्षमा शस्त्र 'असलेल्या व्यक्ती विचलित होत नाही. तो क्षमावृतीपासून ढळत नाही. त्यामुळे सर्वांचे हित साधले जाते व सर्वांना अखंडपणे सुख प्राप्त होते.

**क्षमा शस्त्र जया नराचिया हाती |दुष्ट तया प्रती काय करी ||तृण नाही तेथ पडिला दावाग्नि| जाय तो विझूनी आपसया || तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित| धरा अखंडित सुखरूप||**

**६) शांती:**

शांती हे संत साहित्यातील महत्त्वाचे मानवी मूल्य आहे. संत तुकाराम 'शांती' या मूल्याचे महत्व सांगताना म्हणतात. -

**शांती परते नाही सुख| येर अवघेची दुःख| म्हणूनी शांती धरा |उत्तराल पैलतीरा |**

इतर प्राण्यांपेक्षा माणसाला आयुष्य भरपूर लाभलेले आहे. अशा या जीवनात अनेक बिकट प्रसंग येतात. सुखाचे क्षण कमी असतात आणि दुःखाचे जास्त. अशावेळी शांतपणे आपण त्याला सामोरे गेले पाहिजे .जीवनात जर यशस्वी व्हायचे असेल तर 'शांती' हे मूल्य अंगीकारणे त्यांना महत्त्वाचे वाटते.

**संत साहित्याचा सामाजिक संदेश:**

**१) सामाजिक विषमता आणि जातीभेदाला विरोध:**

**'अठरापगड जाती सकळ वैष्णव |दुजा नाही भाव पंढरीशी||**

यातून संत तुकारामांनी सामाजिक क्षेत्रातील जातीभेदावर प्रहार करून व्यक्तीतील समभावाचा संदेश दिला आहे. प्रा. ग. बा. सरदार म्हणतात," ज्या- ज्या वेळी विषमतेबद्दलची चिड अनावर झाली त्या त्या वेळी त्यानी रुढ कल्पनांचे वाभाडे

काढण्यास कमी केले नाही. समाजातील सर्व जाती ,धर्मामध्ये एकत्वाची भावना जागृत करण्याच्या दृष्टीने संत तुकाराम महाराजांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचा समान अधिकार असावा यासाठी त्यांनी आतोनात प्रयत्न केले.

**२) धार्मिक कर्मकांडांना नकार:**

अंधश्रद्धा, पाखंड आणि अनावश्यक धार्मिक कर्मकांडाचा संत साहित्य निषेध करते . संत तुकारामांच्या धर्मविषयक विचारांमध्ये जप,तप, वृतवैकल्य,मंत्र तंत्र, जादूटोणा,भगवी वस्त्रे, ब्राह्मण दक्षिणा यांना अजिबात स्थान नव्हते. परमेश्वराची मनापासून केलेली भक्तीच त्यांना फक्त मान्य होती .ढोंगी लोकांच्या धर्म भोळपट पणावर त्याने चांगलेच कोरडे ओढले आहेत. ते म्हणतात-

**"ऐसे कैसे झाले भोंदू |कर्म करोनी म्हणती साधू ||अंगा लावूनिया राख|डोळे झाकूनी करिती पाप||**
**दावूनी वैराग्याची कळा| भोगी विषयाचा सोहळा|| तुका म्हणे सांगू किती| जळो त याची संगती||"**

**३) जनसामान्य व लोकभाषा:**

संत साहित्य सामान्य लोकांच्या भाषेतून लोक भाषेतून लोकांना जोडते आणि त्यांच्यात सामाजिक व नैतिक जाणीव निर्माण करते.

**"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने| शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू||१||**
**शब्दची आमुच्या जीवाचे जीवन| शब्दे वाटू धन जनलोका||२||**
**तुका म्हणे पहा शब्दचि हा देव |शब्द ची गौरव पूजा करू ||३||**

तुकाराम हे सतराव्या शतकातील भक्ती संप्रदायातील भक्तिमार्गाचे थोर कवी होते .तुकारामांनी सोप्या सरळ भाषेतून जन माणसाला आवश्यक असलेल्या विचारसरणीला सोपे करण्याचा प्रयत्न केला आहे.

**४) मानवी कल्याण:**

कोणत्याही प्रकारच्या स्वार्थाशिवाय समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणे हा संत साहित्याचा महत्त्वाचा संदेश आहे . विषय वासना, लोभ, मद, मत्सर, द्वेष, क्रोध इत्यादी अवगुणांचा त्याग करावा असे तुकारामांना मनोमन वाटते. त्याग साधण्यासाठी हरिनाम घ्यावे. त्यागामागेच कल्याण आहे. म्हणून अंतरंग शुद्ध करण्यासाठी त्यागाचा अंगीकार करावा असे त्यांना वाटते .

**जया पाहिजे कल्याण| त्याने द्यावा नारायण| सर्व वासणेचा त्याग| करा शुद्ध अंतरंग ||**

**५) धर्मांतरणाला विरोध:**

धर्मांतरणाच्या विरोधात आवाज उठवून लोकांना त्यांच्या मूळ धर्मात आणि संस्कृतीत परत आणण्यासाठी संतांनी प्रयत्न केले.

**६) आजच्या काळातही प्रासंगिक :**

आजही संत साहित्यातील शिकवण सामाजिक आणि नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना करण्यासाठी उपयुक्त आहे.

**निष्कर्ष:**

१) संत साहित्याने समाजातील सर्व स्तरातील लोकांना एकत्र आणण्याचे कार्य केले .जातिभेद ,धर्मभेद किंवाअन्य कोणत्याही भेदभावाला विरोध करून मानवा - मानवात समानता आणि ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला.

२) संतांनी आपल्या साहित्यातून अहिंसा, परोपकार आणि सर्व जीवावर दया करण्याची शिकवण दिली.

३) संत साहित्याने आत्मपरीक्षण करून स्वतःला जाणून घेणार भर दिला.

४) संत साहित्यातील नैतिक मूल्ये व्यक्तीला केवळ अध्यात्मिक मार्गावरच नव्हे तर एक चांगला माणूस बनण्यासाठी देखील प्रेरित करतात.

५) ही मूल्ये आजही समाजाला दिशा देण्याचे काम करत आहेत .कारण ती मानवी कल्याणाचा आणि सुसंस्कृत समाजाचा पाया आहेत.

६) संत साहित्याने केवळ नैतिक मूल्येच रुजवली नाहीत ,तर समाजाला एक नवीन दिशा देवून प्रबोधनाचे कार्य केले.

**सारांश:**

संत साहित्य हे मानवी मूल्यांचे एक महत्त्वाचे स्रोत आहे .ते समाजाला नैतिकतेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते आणि लोकांना अधिक प्रेमळ, करुणामय आणि समताधिष्ठित जीवन जगण्याची शिकवते. सध्याच्या परिस्थितीत समाज आणि राष्ट्राला त्यांच्या शिकवणी आणि विचारांची नितांत गरज आहे. कारण संत साहित्य हे मानवी मूल्यांनी ओतप्रोत आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१) नसीराबादकर ल.रा. -'प्राचीन मराठी वांग्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन कोल्हापूर २००२

२) सरदार ग.बा. - 'संत वांग्मयाची सामाजिक फल श्रुती 'मराठी साहित्य परिषद पुणे - १९७०

3) चौघुले वि.शं.,संत साहित्य आणि समाज प्रबोधन ,अवघा प्रकाशन ,ठाणे , प्रथमावृत्ती २०१३.

४) 'संत कविता एक दृष्टिकोन ' - डॉ. प्रकाश देशपांडे केजकर, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद , प्रथमावृत्ती , २००६ पृ. २४०

५) पाच संतकवी डॉ.श.गो. तुळपुळे.

६) गोसावी र. रा.( संपादक) - सकल संत गाथा खंड१,२

७) भालचंद्र नेमाडे 'तुकाराम' साकेत प्रकाशन औरंगाबाद.

८) पवार गो.मा . : संतांचा जीवनदर्श आणि एकविसावे शतक, ललित ,मे ,१९९८,पृ. ७१

९) मोरे सदानंद: एकविसाव्या शतकात संत साहित्याच्या वारशाची गरज, ललित, मे ,१९९८, पृ.६०

१०) ज. र. आजगावकर, श्री नामदेव महाराज व समकालीन संत.